# मराठी विज्ञान परिषद
## संक्षिप्त अहवाल - सन 2010-2011

**1) बृहन्मुंबई महापालिका शाळांत कार्यक्रम**

बृहन्मुंबई महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांकरिता सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यक्रम करण्यासाठी मराठी विज्ञान परिषदेची निवड झाली. दोन टप्प्यांत झालेल्या या कार्यक्रमात महापालिका शाळांतील विद्यार्थिनींकरिता विज्ञान खेळणी शिबिरांचे आयोजन केले होते. पहिल्या टप्प्यात पंचवीस शाळातील 1281 विद्यार्थिनींना प्रत्येकी दहा खेळणी शिकवणारी दोन-दोन सत्रे प्रत्येक शाळेत फेब्रुवारी 2011 मध्ये घेण्यात आली. दुसऱ्या टप्प्यातील दोन भागांची अंमलबजावणी 11 मार्च ते 30 मार्च, 2011 या काळात करण्यात आली. दुसऱ्या टप्प्यातील एक भाग पर्यावरण आणि सौर ऊर्जा या विषयीच्या समुपदेशनाचा होता. हा उपक्रम 25 शाळांतील 1270 मुलींसाठी घेण्यात आला. तसेच दुसऱ्या टप्प्यातील दुसऱ्या भागात 52 शाळांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना (एकूण 2586) प्रत्येकी बारा खेळणी शिकवण्यात आली. ह्या शाळा कुलाब्यापासून ते एका बाजूला दहिसरपर्यंत तर दुसऱ्या बाजूला मुलुंड-चेंबूरपर्यंत पसरलेल्या होत्या. हा उपक्रम महापालिका शाळांतील वंचित विद्यार्थ्यांना खूप आवडला आणि आनंद देऊन गेला. तसेच एवढा मोठा उपक्रम कमी वेळात करण्यात कार्यकर्ते यशस्वी झाले, ते अभिनंदनास पात्र आहेत. बृहन्मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाने या दोन्ही उपक्रमांसाठी अर्थसहाय्य केले.

**2) कार्यशाळा व कृतिसत्रे**

***2.1) विद्यार्थ्यांकरिताचे उपक्रम***

***2.1.1) विज्ञान प्रयोग शिबिरे -*** शालेय विद्यार्थ्यांना शाळेत विज्ञानाचे प्रयोग स्वतः करायला मिळत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन इयत्ता सहावी ते नववीच्या अभ्यासक्रमावर आधारित 20 प्रयोगांचा समावेश असलेले प्रयोग मेळावे वेळोवेळी घेतले गेले. यावर्षी अशा 2 प्रयोग मेळाव्यात 99 विद्यार्थी सहभागी झाले.

पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांकरिता कमी वेळात होणाऱ्या प्रयोगांच्या 9 कार्यशाळा घेण्यात आल्या. दोन-दोन दिवसांच्या या कार्यशाळांत 420 विद्यार्थी सहभागी झाले होते. अशाच प्रकारच्या छोट्या प्रयोगांच्या कार्यशाळा आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आल्या. अशा 3 कार्यशाळा मिळून 206 विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला.

बालोद्यान हा उपक्रम खास पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांकरिता अहवालसाली एकदा घेतला गेला. त्याचा लाभ 20 विद्यार्थ्यांनी घेतला. गोष्टीतून विज्ञान, छोटे प्रयोग, शालेय बगीचाचा फेरफटका आणि काही खेळ अशा बाबींचा बालोद्यानमध्ये समावेश होता. याखेरीज अंधेरी आणि माहिम येथील शाळांत प्रत्येकी एक कार्यक्रम झाला. त्याचा लाभ अनुक्रमे 30 आणि 43 विद्यार्थ्यांनी घेतला.

**तासकर परिवार विज्ञान प्रसार निधी**

परिषदेचे 15 वर्षे उपाध्यक्ष असलेले श्री. सु. त्रिं. तासकर यांनी परिषदेला रु. 50 लाखाची देणगी निधी म्हणून दिली. या निधीच्या व्याजाचा 1) विभागाना सहकार्य करणाऱ्या शाळांना पत्रिका पाठवणे 2) पत्रिकेचा दर्जा सुधारणे 3) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता कार्यक्रम घेणे 4) संशोधन करून नवीन व उपयुक्त उत्पादन तयार करणाऱ्या लघु उद्योजकाला पुरस्कार देणे. असा विनियोग करणे अपेक्षित आहे. तासकर परिवारास मनःपूर्वक धन्यवाद.

***2.1.2) विज्ञान खेळणी शिबिरे -*** या शिबिरात आपल्याजवळ सहज उपलब्ध असणाऱ्या, तसेच काही फुकट जाणाऱ्या वस्तूंचा वापर करून खेळणी तयार करायला शिकवले जाते. ही खेळणी तयार करताना विद्यार्थ्यांना निर्मितीचा आनंद मिळतो. तद्वतच खेळण्याबरोबर खेळताना विज्ञानाची काही तत्त्वे / नियम ते शिकतात. पाचवी ते सातवी आणि आठवी ते नववी अशा दोन गटांकरिता ही शिबिरे घेण्यात आली. दोन दिवसांच्या प्रत्येकी एका शिबिरात अनुक्रमे 50 आणि 30 विद्यार्थी सहभागी झाले होते. याखेरीज एक दिवसाची विज्ञान खेळणी शिबिरे माहिम, वसई, तुर्भे आणि चेंबूर येथील शाळांत घेण्यात आली. त्याचा लाभ 233 विद्यार्थ्यांनी घेतला.

***2.1.3) अपंगांसाठी विज्ञान प्रसार -*** गेल्या आठ वर्षापासून तीन शाळांतील अंध विद्यार्थ्यांसाठी, तर गेल्या तीन वर्षापासून चार मूकबधीर शाळांतील विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. दादर आणि ताडदेव येथील अंध

विद्यार्थी शाळात प्रत्येकी दोन-दोन कार्यक्रम घेण्यात आले. त्या कार्यक्रमात प्राणी आणि वनस्पती पेशी, हृदय अभिसरण संस्था यांची माहिती प्रतिकृतीच्या सहाय्याने दिली. डॉ. शशिकांत प्रधान यांनी शरीराची वाढ, पोषण आणि रोग प्रतिकार शक्ती या विषयी सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमांचा लाभ एकूण 78 विद्यार्थ्यांनी घेतला. डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात हाडांचा सापळा घेऊन अस्थिसंस्थेची माहिती तिन्ही अंध शाळेतील विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. याचा लाभ 124 विद्यार्थ्यांनी घेतला. तसेच जास्वंदाच्या फुलाचा वापर करून फुलांसंबंधी माहिती तिन्ही शाळात दिली. बदलापूरच्या अंध शाळेत आहार, आरोग्य व त्याचे शरीरावर होणारे परिणाम यासंबंधीची माहिती डॉ. सिंधुताई जोशी यांनी दिली. तसेच याच शाळेत घरांच्या विविध प्रतिकृतीद्वारे इमारतींचे सर्व प्रकार समजावण्यात आले. कान, डोळा, दात, जीभ यांचे शरीररचनेतील महत्त्व प्रतिकृतीद्वारे अंध विद्यार्थ्यांच्या तिन्ही शाळांत सांगण्यात आले. एकूण 132 विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. मूकबधीर विद्यार्थ्यांसाठीच्या कार्यक्रमांतर्गत झवेरी ठाणावाला शाळेत शिक्षकांसाठी प्रयोग मार्गदर्शन शिबिर घेतले. त्याला 12 शिक्षक उपस्थित होते. दिशा कर्णबधीर विद्यालय आणि उत्कर्ष मूकध्वनी विद्यालय तसेच रोचिराम थडानी या तिन्ही शाळांत सूक्ष्मदर्शकाद्वारे वनस्पतीशास्त्राविषयी माहिती देण्यात आली आणि विविध नमुने दाखवले. तिन्ही शाळांना प्रत्येकी एक सूक्ष्मदर्शक भेट देण्यात आला. दिशा कर्णबधीर शाळेतील एका विद्यार्थ्याला कानाला लावायचे श्रवणयंत्र भेट दिले. तर अन्य मूकबधीर शाळांतील एकेका विद्यार्थ्याला त्या यंत्राचे सेल भेट देण्यात आले. **'भारतीय स्त्री शास्त्रज्ञ'** या विषयावरील ब्रेलमधील पुस्तक तयार करून बोर्डी येथील वार्षिक अधिवेशनात प्रकाशित करण्यात आले.

### निर्माण कृतज्ञता पुरस्कार

निर्माण फाऊंडेशन ट्रस्टने सामाजिक कार्यासाठी यावर्षी चार व्यक्तींना पुरस्कार दिले. 6 जानेवारीला निर्माण कृतज्ञता पुरस्काराने सन्मानित केलेल्या चार व्यक्तींमध्ये परिषदेचे कार्यवाह श्री. अ. पां. देशपांडे (ज्येष्ठ विज्ञान प्रसारक) आणि श्री. अभय यावलकर (सौर ऊर्जा प्रसार) यांचा समावेश होता.

### *2.2) प्रौढांकरिता कृतीसत्रे / कार्यशाळा*

***2.2.1) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता शिबीर*** - 'दैनंदिन जीवनातील विज्ञान' या उपक्रमांतर्गत मराठी विज्ञान परिषदेच्या कार्यक्रमात तरुणांचा सहभाग वाढावा, या दृष्टीने या शिबिराचे आयोजन केले होते. बोर्डी येथे दि. 17 डिसेंबर, 2010 रोजी हे शिबिर झाले आणि त्यात 15 विभागांचे 33 महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते. आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र वर्षाचे औचित्य साधून रसायनशास्त्र हा विषय शिबिरासाठी निवडला गेला. कार्यवाह डॉ. मानसी राजाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती चारुशीला जुईकर आणि सहकारी यांनी हे शिबिर घेतले. पहिल्या सत्रात प्रयोग करून दाखवण्यात आले तर दुसऱ्या सत्रात शिबिरार्थींना प्रयोग करून बघण्याची संधी देण्यात आली. दैनंदिन वापरातील द्रावणे घेऊन प्रयोग करावयाच्या सूचना दिल्यामुळे मोठा प्रयोगसंच न देता मोजक्या वस्तू प्रत्येक विभागाला देऊन काम झाले. शिबिरार्थींना अधिवेशनाध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर आणि परिषदेचे अध्यक्ष श्री. प्रभाकर देवधर यांच्याशी संवाद साधता आला, त्यामुळे विद्यार्थी खूष होते.

***2.2.2) शहरी शेती वर्ग*** - घनकचरा समस्या सोडवण्याच्या दृष्टीने मुख्यत्वे शहरात अधिक उपयुक्त असलेला एक मार्ग म्हणजे शहरी शेती. घरात निर्माण होणारा जैविकदृष्ट्या विघटनशील कचरा वापरून भाज्या, फळे असे उत्पादन घेता येते. सूर्यप्रकाश उपलब्ध असेल तेथे शहरी शेती करता येते. या तंत्राची ओळख करून देऊन त्याबाबत सविस्तर माहिती देणारा आणि प्रात्यक्षिकाचा अंतर्भाव असलेला वर्ग परिषदेत घेतला जातो. अहवालसाली परिषदेत तीन तासाचे नऊ वर्ग झाले आणि त्याला 105 व्यक्ती उपस्थित होत्या. याखेरीज `शिशुवन' या शाळेतील चौथीपर्यंतचे 80 विद्यार्थी येऊन त्यांनी शहरी शेतीच्या बगीच्याला भेट दिली आणि त्यांना ही संकल्पना थोडक्यात समजावून सांगण्यात आली. माहूल आणि ठाणे येथे शहरी शेतीवर एकेक व्याख्यान झाले.

***2.2.3) शिक्षकांसाठी कृतिसत्रे*** - अंधेरी येथील शाळेतील शिक्षकांसाठी दोन दिवसाचे एक कृतिसत्र घेण्यात आले. नववी आणि दहावीचे पाच शिक्षक त्यावेळी उपस्थित होते. शिबिरात अभ्यासक्रमाशी निगडीत विषय दृकश्राव्य पद्धतीने आणि प्रयोगाच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात आले.

ग्रामीण भागातील शिक्षकांकरिता अहवालसाली चार कृतिसत्रे घेण्यात आली. डी.एडच्या विद्यार्थ्यांसाठी म्हणजेच भावी शिक्षकांसाठीचे एक शिबिर आजगाव (जि. रत्नागिरी) येथे घेण्यात आले. तसेच विज्ञान मंडळ कसे चालवावे या

उद्देशाने तीन कृतिसत्रे ऑगस्ट महिन्यात मालेगाव (जि. वाशिम), माजलगाव (जि. बीड) आणि एरंडगाव (ता. येवला) येथे घेण्यात आली. त्याला एकूण 187 शिक्षक उपस्थित होते.

**कु. शीतल डापळे हिचा सत्कार**

मुंबईच्या धारावीसारख्या वस्तीत राहून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत कु. शीतल डापळे हिने एम.एस्सी., पीएच.डी.पर्यंत शिक्षण पूर्ण केले. आर्थिक आणि साधनांच्या कमतरतेवर मात करत पूर्ण केलेल्या या शिक्षणाबद्दल कु. शीतलचा परिषदेच्या वार्षिक सभेच्या दिवशी अध्यक्ष श्री. प्रभाकर देवधर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कु. शीतलचे मनःपूर्वक अभिनंदन.

**3) अभ्यासक्रम**

***3.1) विज्ञानमित्र अभ्यासक्रम*** - सात दिवस कालावधीचा हा अभ्यासक्रम शालेय सुट्टीच्या दरम्यान घेण्यात येतो. इयत्ता सहावी ते इयत्ता नववीचे विद्यार्थी यामध्ये सहभागी होतात. विविध विज्ञान विषयांची माहिती, दैनंदिन जीवनातील त्याचे महत्त्व, प्रकल्प, प्रयोग, प्रात्यक्षिके या माध्यमातून दिले जाते. तसेच एका निवासी सहलीचे आयोजन करुन पक्षी निरीक्षण, आकाशदर्शन इत्यादी गोष्टींचा समावेश अभ्यासक्रमात केलेला असतो. अहवालसाली मुंबईत एका कार्यक्रमात 16 विद्यार्थी सहभागी झाले होते. तर रत्नागिरी जिल्ह्यातील विद्याविहार इंग्लिश स्कूल या शाळेतील 41 विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम एप्रिल, 2010 मध्ये चार दिवसात त्या शाळेत घेण्यात आला.

***3.2) संकल्पना विकसन अभ्यासक्रम*** - शालेय विद्यार्थ्यांना विज्ञान अभ्यासक्रमातील विविध संकल्पना पूर्णपणे समजाव्यात हा मुख्य उद्देश ठेवून व्याख्याने, गट चर्चा, प्रश्नमंजूषा, प्रकल्प, प्रयोग, प्रात्यक्षिके, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रश्नोत्तरे असे वेगवेगळे मार्ग वापरून हा अभ्यासक्रम घेण्यात येतो. पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळया कालावधीचे अभ्यासक्रम विज्ञान भवनात घेण्यात आले. त्याचा लाभ एकूण 125 विद्यार्थ्यांनी घेतला. या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी सर्पविज्ञान विषयावर श्री. सुनील कदम, प्रथमोपचार विषयावर डॉ. श्रीरंग बखले आणि डॉ. मानसी राजाध्यक्ष यांची व्याख्याने झाली. अभ्यासक्रमातील प्रयोगांचा अंतर्भाव असलेली सत्रे शिशुवन हायस्कूल, माटुंगा येथे झाली. सातवी आणि आठवीचे अनुक्रमे 18 आणि 20 विद्यार्थी त्यामध्ये सहभागी झाले होते. एप्रिल महिन्यात पाच दिवसात एकूण दहा सत्रे घेण्यात आली. तसेच सरस्वती मंदिर, माहिम येथे सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी दोन सत्रे झाली. त्यात 17 विद्यार्थी सहभागी झाले होते. संकल्पना विकसन अभ्यासक्रमांचे लघुरूप म्हणून सहावी, सातवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी फक्त प्रयोगांवर आधारित उपक्रम घेतला. सातवी आणि आठवीकरिता चार पूर्ण दिवसाची सत्रे सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात घेण्यात आली. त्यावेळी विद्यार्थ्यांनी एकूण 100 प्रयोग स्वतः हाताने केले. या उपक्रमात सातवीचे 12 तर आठवीचे 25 विद्यार्थी सहभागी झाले होते. अशाच पद्धतीच्या सहावीसाठीच्या उपक्रमाची सहा पूर्ण दिवसाची सत्रे नोव्हेंबर महिन्यात पार पडली. त्यामध्ये सहभागी झालेल्या 63 विद्यार्थ्यांनी एकूण 130 प्रयोग स्वतः हाताने केले.

***3.3) पोस्टाद्वारे विज्ञान अभ्यासक्रम*** - विज्ञानाच्या परीक्षा घेण्याची योजना परिषदेने 1998-99 पासून सुरू केली. सर्वदूरच्या विद्यार्थ्यांना त्यामध्ये सहभागी होता यावे म्हणून ही परीक्षा पोस्टाने घेण्याचे ठरवले. या परीक्षात प्रश्नोत्तराबरोबर प्रयोग, प्रकल्प अहवाल, पुस्तक परीक्षण इत्यादींचा समावेश आहे. मराठी माध्यमांच्या सातवी, आठवी आणि नववीच्या मिळून 858 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली, त्यापैकी 531 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. पालकांच्या मागणीनुसार सन 2004-05 पासून इंग्रजी माध्यमातूनही या परीक्षा सुरू केल्या. त्याकरिता सातवी, आठवी आणि नववीच्या मिळून 100 विद्यार्थ्यांनी भाग घेतला. त्यापैकी 51 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

**4) दृकश्राव्य कार्यक्रम**

***4.1) वयात येताना (मुलींसाठी)*** - हा उपक्रम 1983 पासून सुरू आहे. वयात येणाऱ्या मुलीमध्ये होणारे शरीरातील बदल आणि त्या संदर्भातील वैज्ञानिक माहिती दृकश्राव्य-माध्यमाद्वारे मुलींना / महिलांना दिली जाते. अहवालसाली मुंबई व परिसरात 14 कार्यक्रम झाले, त्याचा लाभ 1109 मुली / महिलांना झाला. या कार्यक्रमाच्या 49 व्हीसीडी आणि डीव्हीडी अहवालसाली वितरीत केल्या. हिंदी निवेदन असलेल्या व्हीसीडी आणि डीव्हीडी तयार करून घेण्यात आल्या. अशा एकूण 10 व्हीसीडी आणि डीव्हीडीची विक्री झाली.

***4.2) वयात येताना (मुलांसाठी)*** - मुलांसाठीचा हा उपक्रम 1999 पासून सुरू आहे. मुलींप्रमाणेच मुलांनाही या विषयाचे अचूक वैज्ञानिक ज्ञान देण्याची गरज आहे. ती या उपक्रमाने साध्य केली जाते. अहवालसाली मुंबई व परिसरात याचे 6 कार्यक्रम झाले, त्याचा लाभ 494 मुलांनी घेतला. यावर्षी या उपक्रमाच्या 38 व्हीसीडी आणि डीव्हीडी विकल्या गेल्या.

***4.3) एड्स*** - एड्सची समस्या दिवसेंदिवस अधिक उग्र रूप धारण करीत आहे. त्यावर ठोस उपाय अजूनही उपलब्ध नाहीत. त्यामुळे प्रबोधन हा एकच मार्ग आहे. त्याकरिता सन 2003 पासून हा दृकश्राव्य कार्यक्रम परिषद करीत आहे. अहवालसाली एकूण चार कार्यक्रम झाले, त्याचा लाभ 85 विद्यार्थी / व्यक्ती यांनी घेतला. यापैकी तीन कार्यक्रम मूकबधीर शाळांच्या विद्यार्थ्यांकरिता झाले.

**5) विज्ञान विषयावरील व्याख्याने**

***5.1) ग. ना. सप्रे स्मृती विज्ञान व्याख्यानमाला*** - मराठी विज्ञान परिषदेने लोकमान्य सेवा संघ विलेपार्ले यांच्या संयुक्त विद्यमाने सलग नवव्या वर्षी या विज्ञान व्याख्यानमालेचे आयोजन दि. 6 ते 8 डिसेंबर, 2010 या दरम्यान केले होते. लोकमान्य सेवा संघाच्या गोखले सभागृहात झालेल्या व्याख्यानमालेत 1) डॉ. बाळ फोंडके (जाहिरात आणि विज्ञान), 2) श्री. मकरंद पडळकर (सोशल नेटवर्किंग - आव्हाने आणि संधी), 3) डॉ. राजेंद्र बर्वे (मन : काल, आज, उद्या) यांनी कंसात नमूद केलेल्या विषयावर आपले विचार मांडले. रोज सरासरी 70 श्रोते उपस्थित होते.

***5.2) पाणी समस्या*** - 2009 सालच्या पावसाळयात महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला. मुंबईतही असेच घडले. यानिमित्ताने पाण्यासंबंधी जागरूकता निर्माण करून पाणी बचतीसंबंधी उपाय सुचवणारी व्याख्याने मुंबई व परिसरात अहवालसाली घेण्यात आली. एकूण 30 व्याख्यानांचा लाभ 800 व्यक्तींना मिळाला. तसेच मराठी विज्ञान परिषद आणि पर्यावरण दक्षता मंच यांनी संयुक्त विद्यामाने चुनाभट्टी परिसरातील नागरिकांसाठी पाणी पंचायतीचे आयोजन दि. 2 मे रोजी केले होते. स्थानिक नगरसेविकेसह 30 व्यक्ती यावेळी उपस्थित होत्या. श्री. अ. पां. देशपांडे आणि प्रा. विद्याधर वालावलकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच पाण्यासंबंधी जागरूकता वाढवी या उद्देशाने दि. 13 जून, 2010 रोजी पाणी विषयक सहा फिल्म दाखवण्यात आल्या. त्यावेळी 30 व्यक्ती उपस्थित होत्या.

***5.3) इतर व्याख्याने***

***5.3.1) प्रफुल्लचंद्र रे स्मृती कार्यक्रम*** - प्रफुल्लचंद्र रे स्मृती कार्यक्रम दि. 2 ऑगस्ट, 2010 रोजी आचार्य मराठे महाविद्यालय, चेंबूर येथे झाला. 'रसायनशास्त्रातील आश्चर्ये' या विषयावर शास्त्रज्ञ डॉ. एम. एम. शर्मा यांचे व्याख्यान झाले. त्यावेळी 200 महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

***5.3.2) पर्यावरणस्नेही इमारत*** - या विषयावर एक व्याख्यान अमेरिकेत वास्तव्य असलेले अभियंता डॉ. गजानन सबनीस यांनी दि. 1 सप्टेंबर, 2010 रोजी दिले. रचना संसदच्या वास्तुविशारद महाविद्यालयाचे 125 विद्यार्थी त्यावेळी उपस्थित होते. पर्यावरण प्रश्नावर जागरूकता आवश्यक असताना इमारत उभारताना काय रचना करावी याचा उहापोह या व्याख्यानाद्वारे झाला.

***5.3.3) पालकांसाठी व्याख्याने*** - परिषदेत विविध उपक्रमांना येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी काही खास व्याख्यानांचे आयोजन जून, जुलै आणि ऑगस्ट महिन्यात केले होते. 1) विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी कशी लावावी? 2) वैज्ञानिक दृष्टीकोन 3) स्पर्धा परीक्षांची तयारी आणि 4) विविध पदार्थ या चार विषयावर व्याख्याने झाली. पहिली तीन व्याख्याने डॉ. मानसी राजाध्यक्ष यांनी तर शेवटचे व्याख्यान डॉ. ए. पी. जयरामन यांनी दिले.

**6) संकेतस्थळ आणि विज्ञान पीठ** - मराठी विज्ञान परिषदेचे संकेतस्थळ अद्ययावत स्वरूपात गेल्यावर्षी सुरू केले गेले. त्यावर परिषदेच्या विविध उपक्रमांची माहिती, स्पर्धांची पत्रके, आगामी कार्यक्रम, झालेल्या कार्यक्रमांची छायाचित्रे व बातम्या अशाप्रकारे लोकांना माहिती दिली जात होती. संकेतस्थळावरून माहिती वाचून परिषदेचा विभाग नसलेल्या बंगलोर येथून विज्ञान रंजन कथा स्पर्धेसाठी प्रवेशिका आली.

प्रश्नोत्तर स्वरुपात किंवा अन्यथा एखाद्या विषयाच्या अनुषंगाने चर्चा घडून यावी, त्यामध्ये अनेकांनी सहभागी व्हावे, यादृष्टीने संकेतस्थळावर 'विज्ञानपीठा'ची निर्मिती अहवालसाली करण्यात आली. याला अधिक प्रतिसाद मिळणे

अपेक्षित आहे. शिवाय परिषदेच्या संकेतस्थळावर परिषदेच्या विभागांना सशुल्क स्थान देण्याचे ठरवले. त्याची अंमलबजावणी पुणे विभागाने लगेच शुल्क भरून केली. त्यामुळे परिषदेच्या विभागांना आपले कार्यक्रम सर्वांपर्यंत पोहोचवायला एक आधुनिक माध्यम उपलब्ध झाले.

**7) नवीन उपक्रम**

**इंटरनेटद्वारा विज्ञान प्रसार -** विज्ञानाच्या संकल्पना स्पष्ट करणारे प्रयोग तयार करून त्याचे चित्रीकरण करण्याच्या दृष्टीने गेल्या वर्षी जी तयारी जानेवारी ते मार्च 2010 या तीन महिन्यात केली होती. त्यानुसार एप्रिल 2010 मध्ये 30 प्रयोगांचे चित्रीकरण विज्ञान भवनात करण्यात आले. त्या चित्रिकरणावर पुढील सोपस्कार करून त्याची अंतिम प्रत तयार करून आय.ई.टी.एस.च्या अधिकाऱ्यांना दाखवण्यात आली. त्यानंतर बाहेरील आवाजाचा कोणताही त्रास होणार नाही अशी एक खोली चित्रीकरणाकरिता करावयाचा निर्णय झाला. त्यानुसार विज्ञान भवनातील तळमजल्यावरील एक खोली अशा पद्धतीत सुसज्ज करण्यात आली. तिथे मार्च 2011 अखेर 250 प्रयोगांचे चित्रीकरण पार पडले. परिषदेकडून सर्व प्रयोग, प्रयोग साहित्य देण्यात आले. पण चित्रीकरण व पुढील कार्यवाहीचे काम फॉन्ट अँड पिक्सेल मिडिया प्रा. लि. यांच्याकडे आय.ई.टी.एस. कंपनीकडून सोपावण्यात आले आहे. तिथे अजून 750 प्रयोगांचे चित्रीकरण होणे बाकी आहे, ते काम पुढील वर्षात होईल अशी अपेक्षा आहे.

**8) पंचेचाळिसावे अखिल भारतीय मराठी विज्ञान अधिवेशन -** मराठी विज्ञान परिषदेचे वार्षिक अधिवेशन दि. 18, 19 आणि 20 डिसेंबर, 2010 रोजी बोर्डी (जि. ठाणे) येथे पार पडले. अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर हे अधिवेशनाचे अध्यक्ष होते. अधिवेशनात डॉ. हिम्मतराव बावस्कर (विंचू दंशावरील प्रभावी उपाय), श्री. नरेश राऊत (यशस्वी उद्योजक), श्री. रामचंद्र सावे (प्रगतीशील शेतकरी) आणि श्री. अभिजित घोरपडे (विज्ञान पत्रकारिता) यांचा सन्मान करण्यात आला, तर प्रा. विनय र. र. (पुणे) आणि श्री. रमेश परांजपे (बेलापूर) यांचा विज्ञान प्रसारक म्हणून गौरव केला गेला. अधिवेशनात 'विकास आणि पर्यावरण' तसेच 'शिक्षणातील वेगळ्या वाटा' या दोन विषयावर परिसंवाद झाले. शेतीकरिता माती-जमीन या विषयावर डॉ. चिं. मो. पंडित यांचे व्याख्यान, श्रीमती मेघश्री दळवी यांचे कथाकथन, विद्यार्थ्यांसाठी विज्ञान खेळणी शिबीर आणि खडक व खनिजांची ओळख असे उपक्रम तर महिलांसाठी डॉ. राणी अहंकारी, श्रीमती ज्योती अंबेकर आणि श्रीमती वैदेही रानडे यांच्या मुलाखतींचा कार्यक्रम झाला. स्थानिक आदिवासींची नृत्ये करमणूकीच्या कार्यक्रमात सादर केली गेली. श्री. भास्करराव सावे यांची सेंद्रीय शेती आणि तारापूर अणुऊर्जा केंद्र येथे सहल झाली. उद्घाटनाच्या कार्यक्रमापासून अगदी सहलीपर्यंत खूप चांगली उपस्थिती होती.

**9) विविध स्पर्धा आणि पारितोषिके**

**9.1) *विज्ञान संशोधन पुरस्कार* -** विद्यार्थ्यांनी विज्ञान संशोधनाकडे वळावे या उद्देशाने ही पुरस्कार स्पर्धा 2001-02 पासून घेतली जात आहे. नियमात केलेले बदल आणि स्पर्धेसाठीच्या प्रचारात अनुसरलेली वेगळी पद्धत या दोन्हींमुळे स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे एकूण 13 प्रवेशिका आल्या आणि तिन्ही पुरस्कारांसाठी परीक्षकांना प्रकल्प निवडता आले. एवढेच नव्हे तर तीनपैकी एक पुरस्कार विभागून देण्यात आला. परशुराम बाजी आगाशे विज्ञान संशोधन पुरस्कारासाठी गोगटे महाविद्यालयाच्या (रत्नागिरी) मनोजकुमार सुतार याच्या प्रकल्पाची निवड झाली. लीला परशुराम आगाशे विज्ञान संशोधन पुरस्कारासाठी विरोचन चव्हाण व त्याचे सहकारी या विवेकानंद महाविद्यालयाच्या (चेंबूर) प्रकल्पाची निवड झाली. तसेच शरद नाईक विज्ञान संशोधन पुरस्कारासाठी कु. निकिता कोरगावकर व कु. राजुल तळगावकर या गोगटे महाविद्यालयाच्या (रत्नागिरी) विद्यार्थिनींचा प्रकल्प आणि कु. लावण्या अनंतनारायणन् या खालसा महाविद्यालयाच्या (माटुंगा) विद्यार्थीनीचा प्रकल्प यांची निवड संयुक्तरित्या झाली होती. हे पुरस्कार 2009 सालचे आहेत.

***9.2) हरिभाऊ मोटे विज्ञान पारितोषिक* -** या वर्षीचे पारितोषिक उत्कृष्ट बालविज्ञान पुस्तकासाठी होते. पारितोषिकासाठी आलेल्या 19 प्रवेशिकातून श्री. आनंद घैसास लिखित 'आपली सूर्यमाला' या मनोविकास प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाची निवड पारितोषिकासाठी झाली. लेखक व प्रकाशक दोघांनाही पारितोषिके देण्यात आली.

***9.3) वैद्यक विषयावरील पुस्तकांसाठीची पारितोषिके*** - मराठीतील वैद्यक विषयावरील पुस्तकांसाठी एकूण तीन पारितोषिके दर तीन वर्षातून एकदा दिली जातात. या वर्षीच्या स्पर्धेसाठी एकूण 11 पुस्तके प्रवेशिका म्हणून आली होती.

डॉ. टी. एच. तुळपुळे पारितोषिकासाठी डॉ. कौमुदी गोडबोले लिखित 'जनांसाठी जेनेटिक्स' ह्या पुस्तकाची, डॉ. रा. वि. साठे पारितोषिकासाठी डॉ. प्राची साठे लिखित 'जीवनमृत्यूच्या सीमारेषेवरून' ह्या पुस्तकाची तर डॉ. चंद्रकांत वागळे पारितोषिकासाठी 'एड्स' या डॉ. दिलीप बावचकर यांनी लिहिलेल्या पुस्तकाची निवड करण्यात आली. याखेरीज परीक्षकांचे विशेष पारितोषिक डॉ. संजय ओक लिखित 'वैद्यकश्रुती' या पुस्तकाला देण्यात आले.

***9.4) सौ. सुनंदा वामनराव देसाई विज्ञान रंजन कथा स्पर्धा*** - 1970 पासून घेण्यात येणाऱ्या या स्पर्धेला प्रवेशिका म्हणून 40 कथा आल्या होत्या. अहवालसाली श्री. पराग देऊस्कर (बंगलोर), श्री. राजेंद्र चिमणपुरे (चाळिसगाव) आणि श्रीमती मेघना परांजपे (पुणे) यांच्या कथा गुणानुक्रमे पारितोषिकांसाठी निवडल्या गेल्या.

***9.5) प्रा. डॉ. चिं. श्री. कर्वे विज्ञान निबंध स्पर्धा*** - 1967 पासून घेतल्या जाणाऱ्या या स्पर्धेत 1987 पासून विद्यार्थी गट व खुला गट अशी विभागणी करण्यात आली. प्रथम विभागीय पातळीवर परीक्षण करून विभागीय विजेत्यांमधून राज्यस्तरीय विजेते निवडले जातात. विद्यार्थी गटासाठी 'आपल्या परिसरातील जैवविविधता' हा विषय होता. राज्यभर मिळून 169 निबंध आले होते. त्यातून प्रितम कामथे (तळेगाव), अमित भोये (कल्याण) व ओंकार नवलाखे (नागपूर) आणि अनिकेत रावण (कागल) यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय (विभागून) आणि तृतीय पारितोषिके मिळाली. तसेच खुल्या गटासाठी 'पाणी समस्या आणि उपाय' हा विषय दिला होता. त्याकरिता 260 निबंध आले होते. त्यामधून कु. श्वेता पालवे (उल्हासनगर), श्री. दयानंद बिराजदार (उमरगा) आणि श्री. संजय सूर्यवंशी (साक्री) यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाची पारितोषिके मिळाली.

***9.6) उत्तम विभाग पुरस्कार*** - परिषदेच्या विभागात निकोप स्पर्धा रहावी या उद्देशाने 2002-03 पासून हा पुरस्कार दिला जातो. सर्व विभागांची ग्रामीण आणि शहरी अशा दोन गटात विभागणी केली असून एका वर्षी ग्रामीण तर दुसऱ्या वर्षी शहरी विभागाला हा पुरस्कार देण्यात येतो. यावर्षीचा पुरस्कार ग्रामीण विभागांकरिता होता, त्यासाठी **मराठी विज्ञान परिषद, उमरगा विभागाची** निवड आलेल्या पाच प्रवेशिकांतून करण्यात आली.

***9.7) व्ही. डी. चौगुले पारितोषिक योजना*** - विद्यार्थ्यांनी वर्तमान समस्यांचा अभ्यास करावा आणि त्यावर उत्तरे शोधून प्रकल्प करावेत या उद्देशाने ही स्पर्धा तीन वर्षातून एकदा घेतली जाते. आठवी ते दहावी गटात एकूण 81 प्रवेशिका आल्या होत्या. त्यातून प्रफुल्ल पाटील व कु. लीना महाले (चाळिसगाव), महेश देवईकर व कु. स्विटी मेश्राम (चंद्रपूर) आणि सुमित नवले व प्रसाद सोनावणे (अहमदनगर) तसेच वृषभ देशमुख व कु. श्रद्धा देशमुख (आर्वी जि. वर्धा) यांच्या प्रकल्पांची निवड अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय (विभागून) क्रमांकाच्या पारितोषिकांसाठी झाली. याशिवाय दहा प्रकल्प उत्तेजनार्थ पारितोषिकांसाठी निवडले होते. अकरावी-बारावी गटात मात्र दहाच प्रकल्प आले. त्यातून कु. आश्विनी चांदणे कु. पूजा खानेकर (पुणे) यांच्या प्रकल्पाची निवड तृतीय क्रमांकासाठी झाली.

***10) सहावे राज्यस्तरीय बालविज्ञान संमेलन*** - दर तीन वर्षांनी होणारे राज्यस्तरीय बालविज्ञान संमेलन वणी, जि. यवतमाळ येथे दि. 31 डिसेंबर, 2010, 1 आणि 2 जानेवारी, 2011 या तीन दिवसात पार पडले. महाराष्ट्राच्या 19 जिल्ह्यातील प्रकल्प केलेले 115 विद्यार्थी आणि 40 शिक्षक यामध्ये सहभागी झाले होते. इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील तज्ज्ञ आणि यशस्वी उद्योजक श्री. प्रभाकर देवधर संमेलनाचे अध्यक्ष होते. विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रयोग मेळावा, विज्ञान खेळणी, मातीच्या वस्तू बनवणे आणि प्रदर्शने अशा चार दालनात भाग घेतला. तसेच चौगुले पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांनी व्यासपीठावरून तर इतर विद्यार्थ्यांनी वर्गावर्गातून आपापले प्रकल्प सादर केले. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बाळ फोंडके आणि डॉ. सुधाकर आगरकर यांनी विद्यार्थी-शिक्षक यांना एकत्रितरित्या संबोधताना दैनंदिन जीवनातील उदाहरणांच्या वापर केला आणि प्रयोगांच्या माध्यमातून विषय प्रभावीपणे मांडला. तसेच विद्यार्थ्यांबरोबर आलेल्या शिक्षकांकरिता स्वतंत्र सत्रे श्री. अ. पां. देशपांडे, डॉ. सुधाकर आगरकर आणि प्रा. महादेव खाडे यांनी घेतली. तसेच मराठी विज्ञान परिषद वणी विभागाने विद्यार्थ्यांकरिता दृक माध्यमाचा वापर करून प्रश्नमंजूषा स्पर्धा घेतली. संमेलन प्रतिनिधींनी रसोया प्रॉडक्ट्स या कारखान्याला भेट दिली. तिथे सोयाबीनचे तेल काढण्याच्या प्रक्रियेबरोबर औष्णिक विद्युत केंद्रही सर्वांना पहाता आले.

**11) विज्ञान विषयक प्रकाशने**

***11.1) मराठी विज्ञान परिषद पत्रिका*** - 1967 पासून अखंडपणे हा उपक्रम सुरू आहे. 1987 पासून पत्रिका स्वतंत्र विज्ञान मासिक म्हणून प्रकाशित केले जात आहे. अहवालसाली 32 पानांच्या 10 पत्रिका, महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त प्रकाशित 52 पानी विशेषांक आणि 180 पानांचा दिवाळी अंक एवढा मजकूर पत्रिकेच्या वाचकांना दिला. निसर्गऋण प्रकल्प, सुवर्ण महोत्सवी लेझर, सौरऊर्जेला नाही पर्याय, भारतातील विज्ञान-तंत्रज्ञानाचे बदलते चित्र या मुखपृष्ठ कथांचा प्रामुख्याने समावेश होता. क्षितिजरेखा, अंतराळातून, परिचित-अपरिचित इत्यादी सदरे सुरू होती. विद्यार्थ्यांसाठीचे 'गंमत-जंमत' हे चार पानी खास सदर सुरू होते. दिलीप दोंदे यांची एकल सागरपरिक्रमा, सायबर गुन्हेगारी, फुलपाखरे स्वच्छंदी, मौक्तिक एकावली, उत्क्रांती घरगुती भांड्यांची असे विविध विषयावरील लेख, त्याचबरोबर पाच विज्ञानकथा आणि जन्मशताब्दी वर्ष लक्षात घेऊन खगोलशास्त्रज्ञ सुब्रमण्यम चंद्रशेखर यांचे लालित्यपूर्ण चरित्र या सर्वांनी दिवाळी अंक सजलेला होता. दरमहा सरासरी 4500 अंक वाचकांना पाठवले जात होते.

***11.2) स्वस्त दरातील पुस्तिका*** - 'शहरी शेती कशी करावी?' (लेखक : दिलीप हेर्लेकर) हे नविन पुस्तक श्री. बळवंत बापट यांच्या अर्थसहाय्याने तर 'खेळातून विज्ञान' (तिसरी आवृत्ती) - सुधारित स्वरुपात अहवालसाली छापण्यात आली. या वर्षात सुमारे रु. सदुसष्ठ हजारची पुस्तक विक्री करण्यात आली. विज्ञान प्रसारने अर्थसहाय्य मान्य केलेली 'बाळांसाठी सर्व काही' (अनु. डॉ. मंदाकिनी पुरंदरे) आणि 'प्रयोगातून सिद्धान्ताकडे' (ले. डॉ. अजय महाजन) ही पुस्तके अहवालसाली प्रकाशित केली.

***11.3) दैनिकातील सदरे*** - मराठी विज्ञान परिषदेतर्फे लोकसत्तामधील 'कुतुहल' हे सदर सलग सहाव्या वर्षी सुरू होते. सन 2010 मध्ये वैद्यकशास्त्राविषयी लेख होते तर जानेवारी 2011 पासून 'अभियंत्रिकी' या विषयावर लेख छापण्यात येत आहेत. लोकसत्ताच्या सदराचे जानेवारी 2011 पासून संयोजन श्री. अ. पां. देशपांडे करत आहेत. याखेरीज दैनिक सामनामध्ये `शास्त्रज्ञ ओळख' या विषयावर एक 80 लेखांची मालिका प्रसिद्ध करण्यात आली. त्याचे संयोजन श्री. अभय यावलकर यांनी केले. नागपूर लोकमतकडून आहार व आरोग्य विषयक साप्ताहिक सदर प्रसिद्ध होत आहे. त्याचे समन्वयक डॉ. शशिकांत प्रधान आहेत. पुणे येथील केसरीने अशी विचारणा केली होती. त्या साप्ताहिक सदराचे संयोजन मराठी विज्ञान परिषद, पुणे विभाग करीत आहे.

***11.4) विज्ञान-तंत्रज्ञान कोश*** - अहवालसाली या कोशाच्या 148 प्रतींची विक्री परिषदेतर्फे झाली. बृहन्मुंबई महापालिका शाळा (55) आणि इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या शाळा (60 प्रती) हे प्रमुख खरेदीदार होते. विज्ञान आणि तंत्रज्ञान कोशाची सीडी तयार करण्याच्या प्रकल्पाला सुरुवात झाली आहे. ते काम पुढील वर्षात पूर्ण होईल. छापील कोशापेक्षा काही जास्तीच्या नोंदी, सर्व नोंदीबरोबर चित्रे आणि दृकमाध्यमाशी सुसंगत काही जास्तीच्या सोयी सीडीमध्ये असतील.

***11.5) शिल्पकार चरित्रकोश*** - गेल्या दोनशे वर्षात महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान दिलेल्या व्यक्तींचा चरित्रात्मक कोश छापण्याचा एक प्रकल्प साप्ताहिक विवेकने हाती घेतला होता. त्यामधील विज्ञान व तंत्रज्ञान खंडाची जबाबदारी परिषदेवर सोपवली होती. अहवालसाली 20 जून, 2010 रोजी डॉ. अनिल काकोडकर यांच्याहस्ते या कोशाचे प्रकाशन पुणे येथे झाले. विज्ञान-तंत्रज्ञान आणि शिक्षण असा संयुक्त कोश प्रकाशित केला आहे. या कोशाच्या लेखकांनी घेतलेल्या 16 प्रती लक्षात धरून 27 प्रती परिषदेतर्फे विकल्या गेल्या.

***11.6) मराठीतील विज्ञान लेखन*** - सन 1830 ते 1950 या कालावधीत नियतकालिकात जे विज्ञान विषयक लेख मराठीतून प्रसिद्ध झाले आहेत, ते मिळवून त्यापैकी निवडक लेखांचे चारशे पानांचे दोन खंड प्रकाशित करावयाचे आहेत. या उपक्रमाचे काम गेली तीन वर्षे सुरू असून, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील पंधरा विविध विषयातील 16 तज्ज्ञांनी वाचन करून 221 लेख निवडले आहेत. या खंडासाठी प्रस्तावना प्रा. भा. मा. उद्गावकर यांनी लिहून दिली आहे. यापैकी पहिला खंड पूर्ण झाला असून तो एप्रिल 2011 मध्ये प्रकाशित करण्यात येईल. या खंडाचे संपादन श्री. अ. पां. देशपांडे आणि डॉ. विवेक पाटकर करीत आहेत तर विज्ञान प्रसार, नवी दिल्ली यांनी या प्रकल्पाला अर्थसहाय्य दिले आहे.

**12) विज्ञान प्रसाराचे इतर कार्यक्रम**

***12.1) विज्ञान सफर*** - परिषदेच्या विज्ञान भवनाला भेट देऊन विद्यार्थी अनेक प्रकारच्या कार्यक्रमात सहभागी होतात. प्रयोग करण्याबरोबर परिसरातील झाडे, पक्षी, शालेय बगीचा, शहरी शेती, परिषदेतील भित्तीचित्रे इत्यादींची माहिती घेतात. अहवालसाली 11 कार्यक्रमात 580 विद्यार्थी सहभागी झाले. त्यामध्ये प्रत्येकी एक कार्यक्रम मूकबधीर विद्यार्थ्यांसाठी आणि अंध विद्यार्थ्यांसाठी झाला, त्याचा लाभ अनुक्रमे 35 विद्यार्थी आणि 22 विद्यार्थिनींनी घेतला.

***12.2) वर्धापन दिन*** - परिषदेचा चव्वेचाळिसावा वर्धापन दिन दि. 25 एप्रिल, 2010 रोजी झाला. प्रमुख पाहुणे म्हणून गोवा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप देवबागकर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते तीन विज्ञान संशोधन पुरस्कार आणि हरिभाऊ मोटे पारितोषिक यांचे वितरण करण्यात आले. त्यानंतर डॉ. देवबागकरांनी दीडशे उपस्थितांसमोर विज्ञान संशोधनासंबंधी आपले विचार मांडले.

***12.3) मला आवडलेले पुस्तक*** - रविवार दि. 22 ऑगस्ट, 2010 रोजी हा उपक्रम घेण्यात आला. श्री. अच्युत गोडबोले यांनी लिहिलेल्या तीन पुस्तकांविषयी तीन वाचकांनी सादरीकरण केले. नंतर श्री. अच्युत गोडबोले यांची श्री. विनायक कर्णिक यांनी मुलाखत घेतली.

***12.4) मुरली छुगानी संदर्भालय आणि रामभाऊ म्हसकर, अंमळनेर सीडी वाचनालय*** - परिषदेच्या संदर्भालयात अहवालसाली 69 पुस्तकांची भर पडली. त्यामध्ये मुख्यत्वे डॉ. सुधाकर सोमण, डॉ. बाळ फोंडके, श्री. अ. पां. देशपांडे यांनी भेट दिलेल्या पुस्तकांचा समावेश आहे. वर्षअखेर पुस्तकांची संख्या 4740 पर्यंत पोहोचली होती. संदर्भालयात उपलब्ध असलेली प्रदर्शने श्री. सरस्वती विद्या मंदिर (भांडुप), मौज प्रकाशन यांनी गोरेगाव येथे वार्षिक व्याख्यानमालेच्या प्रसंगी, सोर्स गट (माहूल) यांनी नेऊन मांडली होती.

डॉ. रामभाऊ म्हसकर सीडी वाचनालयातील सीडी संग्रहामध्ये 76 सीडींची भर पडून अहवालसाली ही संख्या 416 पर्यंत पोहोचली आहे. या वर्षी सीडी वाचनालयाचे 36 सभासद होते. ते नियमितपणे वाचनालयाचा लाभ घेत आहेत. परिषदेतील विविध उपक्रमांच्यावेळी ही सीडी दाखवण्यात येतात.

***12.5) राष्ट्रीय विज्ञान दिन*** - 28 फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी मध्यवर्ती आणि परिषदेचे 33 विभाग यांनी या निमित्ताने कार्यक्रम घेतले. मुंबईत व्याख्याने, सर्वसाधारण विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, अंध आणि मूकबधीर विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, क्षेत्रभेट, रसायनशास्त्र प्रयोग कार्यशाळा आणि सांगता समारंभ असे कार्यक्रम फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आले. दैनंदिन जीवनातील रसायनशास्त्र हा विषय शासनातर्फे सुचवण्यात आला होता. या उपक्रमाला यावर्षी राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाने दिलेल्या प्रस्तावाच्या 70 टक्के अनुदान खूप उशिरा मंजूर केले.

***12.6) महिला दिन*** - आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त दि. 12 मार्च रोजी कार्यक्रम झाला. त्यामध्ये श्रीमती स्मिता तळवलकर (नाट्य व सिनेसृष्टी) आणि डॉ. विनया जंगले (वन्यप्राणी स्थलांतर) यांनी आपले अनुभव उपस्थितांसमोर मांडले.

***12.7) नवीन इमारत*** - मराठी विज्ञान परिषदेच्या विज्ञान भवनाची नवीन इमारत बांधण्याचा संकल्प दोन वर्षापूर्वी आखला. तज्ज्ञांशी सल्लामसलत करून आराखडा तयार केला आहे. या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात निधी उभारणी आवश्यक असल्यामुळे त्यादृष्टीने अध्यक्ष श्री. प्रभाकर देवधर प्रयत्नशील आहेत. अहवालसाली 144 व्यक्ती आणि संस्था यांच्याकडून सतरा लाखाचा निधी जमला. यापूर्वीच्या या कामाकरिता जमा झालेल्या देणग्या लक्षात धरता एकोणसत्तर लाखांचा निधी उभा झाला असला तरी एकूण 6 कोटीचा निधी उभारणे अपेक्षित आहे.

***12.8) नवीन विभाग*** - अहवालसाली श्रीरामपूर आणि संगमनेर (जि. अहमदनगर) येथे दोन नवीन विभाग सुरू झाले तर कार्यरत नसलेल्या भोपाळ विभागाची मान्यता रद्द करण्यात आली. त्यामुळे वर्षाअखेरीस विभागांची संख्या 69 झाली.